-२९०- -२८९- २९२-
-७२९-

<u>महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ कलम ४४ अन्वये कोळसा भट्टया लावण्यासाठी बिनशेती वापराच्या तात्पुरत्या परवानगी बाबत..</u>

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
क्रमांक: अनअपी-१०८७/१६२०३/सीआर-११२८/ल-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ११ मे १९८७

## आदेश

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४४ अन्वये कोळसा भट्टया लावण्यासाठी जमिनीचा बिनशेती वापर करावयाचा झाल्यास, त्याबाबतची अकृषिक परवानगी देण्यात येते. तेव्हा याव्दारे जिल्हाधिका-यांना असे आदेश देण्यात येते आहेत की, कोळसा भट्टयांसाठी जमिनीचा तात्पूरता अकृषिक वापर करण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत बिनशेती परवानगी देण्यात येऊ नये.

२. शासनाचे सदर आदेश जिल्हाधिका-यांनो सर्वसंबंधीत अधिका-यांच्या नजरेस आणून सदर शासनाचे आदेश तात्काळ अंमलात आणावेत व त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. तसेच शासनाचे सदर आदेश अंमलात आल्यानंतर कोळसा भट्टयांसाठी जमिनीचा अनधिकृत अकृषिक वापर होणार नाही याची योग्य ती खबरदारी घेण्यासाठी जिल्हाधिका-यांनी संबंधित अधिका-यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

[ रा. वा. आडिवरेकर ]
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग.

कारी कार्यालय,
त्नागिरी.
MAY 1987
उ. जि. जिल्हाधिकारी